# प्रकरण - पाचवे

---

# उपसंहार व निष्कर्ष

# प्रकरण - पाचवे

## उपसंहार व निष्कर्ष

**अ ) उपसंहार :**

स्वराज्याचे प्रमुख उद्दिष्ट गाठण्यासाठी मो. क. गांधींनी सर्वोदयाचा विचार मांडलेला आहे. परंतू गांधींच्या अकस्मित मृत्यूमूळे त्यांचे 'स्वराज्य स्थापनेचे उद्दिष्ट पूर्ण होवू शकले नाही. गांधी विचारांना प्रत्यक्ष व्यवहारात आणण्यासाठी उत्तर गांधीवादी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला. यामध्ये विनोबा भावे यांनी सर्वोदयाच्या अध्वूर्याची भूमिका पार पाडली. त्यांनी "सर्वांसाठी प्रत्येकजण आणि प्रत्येकासाठी सर्वजण" हे मूलभूत तत्त्व सर्वोदय समाजासाठी प्रमुख मानले. आणि सर्वोदयाचा विकास केला. विनोबा भावेंच्या बरोबर दादा धर्माधिकारी, जयप्रकाश नारायण, धिरेंद्र मुजुमदार यांनी सर्वोदयाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले आहेत.

सर्वोदय संकल्पनेचा विकास करण्यासाठी दादा धर्माधिकारींनी गांधी-विनोबा यांच्या सर्वोदय विचारांचा आधार घेऊन त्याच विचारांची नव्याने मांडणी केली. त्याच बरोबर सामाजाच्या विकासासाठी स्वतः काही नवीन विचार मांडले आहेत. दादांनी क्रांतीच्या विचारात अहिंसक लोकक्रांतीची नवीन प्रक्रिया सांगितली आहे. कारण लोकक्रांतीतून लोकतांत्रिक शासन व्यवस्था निर्माण होवू शकेल. असा त्यांना विश्वास होता. या लोकतांत्रिक शासन व्यवस्थेसाठी त्यांनी सर्वोदयाचे अर्थशास्त्र हा नवीन अर्थरचनेचा मार्ग सांगितला आहे. सर्वोदय अर्थशास्त्राचा उद्देश सर्वांगीण समाजाच्या विकासाचा आहे. सर्वोदय समाजात स्त्री-पुरूष समानतेबरोबर स्त्री-पुरूष सहजीवनाचा महान विचार मांडला आहे. अशा अनेक विचारांनी परिपूर्ण असणारे दादांचे सर्वोदयाचे तत्त्वज्ञान समाजास नवीन समाज रचनेकडे आणि विकासाकडे घेऊन जाणारे आहे. दादांच्या सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानाला प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न होत आहेत. आणि ते विचार समाजात दृढ होताना दिसून येत आहेत असे हे दादांचे विचार मानवी समाजरचनेला प्रेरणादायी ठरत आहेत.

प्रस्तुत प्रकरणात शोधप्रबंधातील एकूण सर्व प्रकरणांचा थोडक्यात परामर्श घेऊन मूल्यमापन करण्यात आलेले आहे. प्रथम शोधप्रबंधातील पहिल्या प्रकरणाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

प्रकरण एक मध्ये सर्वोदय विचाराच्या ऐतिहासिक विकासक्रमांचा आढावा घेतला आहे. मो.क. गांधी यांना सर्वोदय तत्त्वज्ञानाचे मूळ कसे आणि कोठे सापडले? सर्वोदय विचाराची सद्य:कालीन समाजासाठी का गरज भासली? याचे थोडक्यात विवेचन केले आहे. गांधींना अभिप्रेत असणारी सर्वोदय समाजरचना निर्माण करण्यासाठी जी मुळ समाजव्यवस्था कारणीभूत होती. त्यासंबंधीत समाजव्यवस्थेची परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याशिवाय सर्वोदय समाजाच्या विकासासाठी आवश्यक असणारा मार्ग सांगितला आहे. वाढत्या औद्योगिकरणातून यांत्रिकीकरणातून निर्माण होणारी बेकारीची समस्या, हाताच्या बोटावर वाढणाऱ्या श्रीमंतीच्या संख्येबरोबर असंख्य प्रमाणात वाढणारी बेकारी आणि केंद्रिय सत्तेचे निराकरण करण्याचा मार्ग येथे सांगितला आहे. सर्वोदय विचाराच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक समस्यांचे निराकरण करून अखिल मानवाच्या कल्याणाच्या, उदयाच्या विचारांचे विवेचन केले आहे. या सर्व विचारांचा परामर्श घेऊन दादा धर्माधिकारी यांचा संपूर्ण जीवन परिचय जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने दादा सर्वोदय विचाराकडे कसे आकर्षित झाले हे नमूद केले आहे. त्याचबरोबर संशोधनाची कोणती उद्दिष्टे ठरविली आहेत. या विषयावर संशोधन करण्यामागील हेतू आणि संशोधनासाठी ठरविण्यात आलेली गृहितके जाणून घेवून शोधप्रबंधासाठी ज्या संशोधन पद्धतीचा अवलंब केला गेला आहे. याचा सविस्तर आढावा घेतला आहे.

'सर्वोदय विचारधारेचा उदय आणि विकास' या प्रकरण दोनमध्ये सर्वोदयाच्या मूळ कल्पनेतून कसा उदय झाला याचा विचार मांडला आहे. पाश्चात्त्य उपयुक्तता वादाच्या सिद्धांतातून संपूर्ण समाजाचा विकास होत नाही. तर तेथे अधिकात अधिकाचे

सुख साधण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हा या तत्त्वाला फाटा देवून संपूर्ण समाजाच्या उदयाची भूमिका सर्वोदयाने घेतली आहे. जॉन रस्कीनच्या Unto this last या पुस्तकाचा गांधींवर विलक्षण प्रभाव पडला होता. त्यातून त्यांनी 'अंत्योदयाची' संकल्पना समजावून घेतली आणि त्याचेच पुढे 'सर्वोदय' नावाने नामकरण केले. मो. क. गांधींच्या मृत्यूनंतर विनोबा भावे यांनी प्रामुख्याने सर्वोदय विचारधारेच्या विकासाचा मूळ आरंभ केला. भूदान यज्ञ, अहिंसक क्रांती, साम्यवाद-साम्ययोग, लोकनीती यासारख्या अनेक विचारांची भर घालून सर्वोदय समाज निर्माण करण्याचा अथक प्रयत्न केला आहे.

साम्यवादाकडून सर्वोदयाकडे जाणारा महान प्रतिभावंत नेता म्हणजे जयप्रकाश नारायण होय. त्यांनी भूदान यज्ञासाठी दिलेल्या संपूर्ण जीवनदानाचा उल्लेख येथे केला आहे. जयप्रकाश नारायण यांनी साम्यवादातील दोषाचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी त्यांनी संपूर्ण क्रांतीचा मार्ग सुचविला आहे. सर्वोदय विचारांना प्रत्यक्ष व्यवहारिक स्वरूप देणारे गांधीवादी कार्यकर्ते धिरेंद्र मुजुमदार यांनी गावपातळीपर्यंत सत्तेचे केंद्रीकरण होण्याच्या गरजेवर अधिक भर दिला आहे. त्यासारख्या गांधीवादी विचारवंतांच्या सर्वोदय विचारांचा आणि कार्याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. सर्वोदय विकास प्रक्रियेबाबत याच प्रकरणात विवेचन केले आहे. भारतीय प्राचीन ग्रंथामध्ये असणाऱ्या सर्वोदयाच्या उल्लेखापासून ते बायबल, Unto this last यासारख्या ग्रंथाप्रमाणे आजपर्यंत अनेक विचारवंतांनी केलेल्या विकासाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण तीन मध्ये 'दादा धर्माधिकारी यांचा सर्वोदय विचार आणि दृष्टिकोन' यांचा संपूर्ण अभ्यास केला आहे. प्रामुख्याने गांधी आणि विनोबा यांच्या विचारांना अनुसरून दादांनी सर्वोदयाच्या कार्याचा केलेला विकास अभ्यासला आहे. सद्य:कालीन समाजाची परिस्थिती विचारात घेवून त्याच्या उपायासाठी सर्वोदयाच्या सांस्कृतिक आधारामध्ये दादांनी मानवीय आणि भौतिक मूल्यांचा समावेश करून मानवीय विभूतीयोगाचे दर्शन

होणे गरजेचे आहे असे स्पष्ट केले आहे. साम्यवादी क्रांतीच्या परिणामांचा विचार करून अहिंसक लोकक्रांतीचा विचार त्यांनी मांडला आहे. क्रांतीचा हेतू साध्य करण्यासाठी ह्दय-परितर्वन, समाज-परिवर्तन या साधनांचा वापर केला आहे. त्याचप्रमाणे राजनीतीमधील दोषांकडे बोट दाखवून लोकनीतीचा आग्रह धरला आहे. दादा लोकशाहीचे उपासक होत. त्यांना जनतेची प्रत्यक्ष लोकशाही अभिप्रेत होती. या सर्व विषयांचा परामर्श घेतला आहे.

संघटन, संयोजन आणि सहजीवन यामध्ये मानव केंद्रित अहिंसेच्या संघटनेला दादांनी अग्रस्थान दिले आहे. त्यामध्ये मैत्री, स्वातंत्र्य, समानता, बंधूभाव यांचा समावेश केला आहे. स्त्री-पुरूष समानता, बंधूभाव यांचा समावेश केला आहे. स्त्री-पुरूष समानतेबरोबर स्त्री-पुरूष सहजीवनाचा वेगळा विचार त्यांनी मांडला आहे. स्त्रियांना नागरिकत्त्व ब्रह्मचर्य आणि पुरूषांच्या बरोबरीची वागणूक देण्यासाठी त्यांना प्रयान केले आहेत. त्यातूनच दादांना मानवनिष्ठ अर्थनिती असणारी समाजव्यवस्था निर्माण करायची होती. सर्वोदय समजासाठी सर्वोदयाचे वेगळे अर्थशास्त्र सांगितले आहे. गांधीच्या ट्रस्टीशिप सिद्धांताच्या अनुशंगाने आपला ट्रस्टीशिपचा विचार मांडून 'सहयोग' आणि 'प्रतिकार' म्हणजे सहयोगात्मक प्रतिकाराच्या प्रयोग स्पष्ट केला आहे. प्रेम आणि प्रतिकार यांचे सहचर्य समाजाच्या विकासासाठी आवश्यक असते. साध्य साधन विवेकाची गरज काय आहे हे स्पष्ट केले आहे. अशा प्रकारे दादा धर्माधिकारी यांच्या संपूर्ण सर्वोदयाच्या विचारांचा या प्रकरणात आढावा घेतला आहे.

प्रकरण चार मध्ये दादा धर्माधिकारी यांनी सर्वोदयाच्या मुळच्या विचारात काही विचारांची भर घातली आहे. आणि या विचारातून सर्वोदय विचाराचा विकास केला आहे. सर्वोदय समाजव्यवस्था स्थापनेसाठी प्रचलित समाजव्यवस्था बदलणे गरजेचे आहे. या समाज बदलासाठी 'अहिंसक लोकक्रांतीचा' नवीन मार्ग त्यांनी सांगितला आहे. या अहिंसक लोकक्रांतीत जनतेला महत्त्वाचे स्थान आहे. कारण ती जनतेच्या विकासासाठी

करण्यात येणार आहे. या क्रांतीच्या प्रक्रियेत 'स्वेच्छासमर्पण', 'संपत्तीदान', 'ह्रदयपरिवर्तन यांचा मार्गाचा अवलंब असल्याने ती सार्वभौम समाजक्रांती होईल असा त्यांचा विचार आहे. या क्रांतीच्या प्रक्रियेतून त्यांना लोकतांत्रिक लोकशाही शासनव्यवस्था अभिप्रेत होती. म्हणून लोकतांत्रिक शासन व्यवस्थेचा विचार मांडला आहे. सर्वोदय समाजव्यवस्थेत असणाऱ्या लोकतंत्रामध्ये दादांनी नवीन सर्वोदयाचे अर्थशास्त्र मांडले आहे. या अर्थशास्त्राच्या विचारानूसार अर्थरचना निर्माण होईल. असा त्यांना विश्वास होता या अर्थरचनेत कोणीही स्वत:साठी वस्तूंचे, सेवांचे उत्पादन करणार नाही तर संपूर्ण समाजाच्या गरजा भागविण्यासाठी उत्पादन केले जाईल. तेथे श्रमाला मोबदला दिला जात नाही. श्रम ही मानवी मूल्य असल्याने श्रमदान होणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते.

सर्वोदय समाजात विषमता, भेदभाव यांना स्थान नाही. स्त्री-पुरूष समानतेबरोबर त्यांनी पुरूषांच्या बरोबरीची वागणूक मिळण्यासाठी त्यांना नागरिकत्त्व आणि ब्रह्मचर्यात सहभागी करून घेण्याचा विचार मांडला आहे. यातूनच 'स्त्री-पुरूष सहजीवना'चा विचार पुढे आला आहे. समाजात निर्माण होणाऱ्या संघर्षांचे निराकरण करण्यासाठी 'सहयोगात्मक प्रतिकाराचा' मार्ग दादांनी सांगितला आहे. समाजातील वर्ग पूर्णत: कधीही नष्ट होणार नाहीत म्हणून समजात अस्तित्त्वात असणाऱ्या वर्गांना नष्ट करण्यापेक्षा त्यांचे निराकरण करण्याचा त्यांचा विचार होता. अशा अनेक विचारांची भर घालून दादांनी गांधी, विनोबांच्या सर्वोदयाच्या विचारास नवीन मार्ग दाखवून सर्वोदयाच्या विकासासाठी प्रयत्न केला आहे.

**ब ) निष्कर्ष :**

१) सद्य:कालीन समाज व्यवस्थेत प्रत्येकजण आपल्या स्वार्थाचा विचार करत आहे. राज्यकर्त्या वर्गाकडून आपल्याशी संबंधित असणाऱ्याच्या विकासाचा संकुचित दृष्टिकोन राबवला जातो. अल्पसंख्यांकावर, बहुसंख्यांक वर्गाकडून शोषण, अन्याय, अत्याचार होतात. समाजात एका बाजूला सुखाचा डोंगर आणि दुसऱ्या बाजूला

अठराविश्वे दारिद्र्य असते अशी ही समाजव्यवस्था बदलणे गरजेचे आहे तेव्हा दादांनी सांगितलेला सर्वोदय समाजाचा मार्ग स्वीकारल्यास नवसमाजरचना होवू शकते. त्या समाजात कोणी शासक नसते. आणि कोणी शासित नसते. त्यामुळे राज्यकर्त्यांची, शासनाची गरज भासत नाही. म्हणून दादांच्या विचारानुसार नवसमाजरचना स्थापन करणे गरजेचे आहे.

२) समाजामध्ये आजही सामाजिक, धार्मिक, जातीय, प्रांतीय, जमातवादी दंगली घडत आहेत. या दंगलींचा प्रदिर्घ हिंसक घटनांचा इतिहास आपणास पहावयास मिळतो. आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते लहान-लहान कुटुंबापर्यंत हिंसेचा प्रवास चालू आहे. अशा हिंसक घटनापासून समाजाला परावृत्त करण्याची आज काळाची गरज बनली आहे. समाजातील हिंसक परिस्थिती बदलण्यासाठी दादा धर्माधिकारींनी मांडलेला सर्वोदयाचा अहिंसक मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे.

३) आजच्या परिस्थितीत व्यक्तींच्या विकासासाठी समजाकडून काही प्रमाणात प्रयत्न होत आहेत. त्यासाठी व्यक्तींना स्वातंत्र्य ही दिले आहे. परंतु, त्या स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्या आहेत. त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. म्हणून दादा धर्माधिकारींचा आदर्श समाज जीवनाचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. कारण दादांच्या सर्वोदयाचा विचार अखिल मानव जातीच्या कल्याणाची हमी देणारा. सर्व मानवांना कवेत घेणारा, उपयुक्त व दिशादर्शक विचार आहे. त्याच्या आजच्या समाजास उपयुक्तता आहे.

४) औद्योगिकरणातून मोठ्या प्रमाणात यांत्रिकिकरण झाले त्यातही लोकसंख्या सुद्धा वाढत गेली. त्यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार वाढला नाही. यांत्रिकिकरणामूळे बेकारीत वाढ झाली. म्हणून यंत्राचा मर्यादित अशक्य कामासाठी उपयोग करावा आणि मानवी श्रमाचा उत्पादनासाठी उपयोग करावा म्हणजे बेकारीचा प्रश्न निर्माण होवू शकणार नाही. म्हणून दादांनी सांगितलेला मर्यादित यांत्रिकिकरणाचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

५) वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न आज भारतासारख्या मोठ्या देशात निर्माण झाला आहे. तेव्हा त्यांना त्यांच्या मूलभूत गरजांचीही पूर्तता होवू शकत नाही. म्हणून दादांनी सांगितलेला संपत्तीदानाचा मार्ग प्रत्येकाने अवलंबल्यास ज्यांच्या मुलभूत गरजांची पूर्तता होवू शकत नाही. त्यांच्या गरजांची काही प्रमाणात तरी पूर्तता होईल. त्यामुळे जनतेवर येणाऱ्या उपासमारीच्या प्रश्न सुटू शकेल. यासाठी सर्वोदयाचा मार्ग अवलंबण्याची खूपच गरज आहे.

६) सद्य:कालीन समाजात सर्वच क्षेत्रात विषमतेची दरी निर्माण झाली आहे. त्यामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांचे भयानक पडसाद उमटताना दिसत आहेत. या विषमतेतून वरिष्ठ-कनिष्ठ असे वर्ग समाजात तयार झाले आहेत. या वर्गामध्ये परस्परात मतभेत, संघर्ष होत आहे. या संघर्षातून हिंसेचा पर्यायी मार्ग स्वीकारला जातो. म्हणून संघर्षाचे रूपांतर 'सहयोगात्मक प्रतिकारात' केले पाहिजे. यासाठी दादांचा सर्वोदयाचा विचार समाजात संघर्षापासून परावृत्त करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

७) तत्त्कालीन भारतात आर्थिक, सामाजिक परिस्थितीत मोठ्या प्रमाणात वाढत असलेले औद्योगिकीकरण, बेकारी, दारिद्र्य, संघर्ष, अन्याय-अत्याचार अशा माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडत आहेत. तेव्हा त्यामागील औचित्त्य तपासून या परिस्थितीत बदल करण्यासाठी सर्वोदयाचा मार्ग स्वीकारने गरजेचे आहे.

अशाप्रकारे प्रस्तुत प्रकरणात शोधप्रबंधातील सर्व प्रकरणाचा आढावा घेऊन निष्कर्ष काढले आहेत. वरील पाचही प्रकरण रचनांच्या अनुषंगाने दादा धर्माधिकारी यांच्या सर्वोदय तत्त्वज्ञानाचा राजकीय चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात केला आहे.